| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**<br>डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१ | |
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजीआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य | | संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>नानोप विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


**महत्वाचे परिपत्रक** जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८ ३/बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबत/ /२०

दिनांक:- / /२०२०

4828-5089
03-03-2020.

प्रति,

१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु, महानगरपालिका,.....(सर्व)
३) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू, जिल्हा परिषद ..............(सर्व)
४) मुख्याधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यू, नगर पालिका/नगर परिषद/नगर पंचायत सर्व
५) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यू, कटक मंडळे, ......(सर्व)

विषय :- **जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबत.**

**संदर्भ -** या कार्यालयाचे परिपत्रक क्रं.१२ जा.क्रं.आमाजीआ/कक्ष-८ ३/नाव समाविष्ट/अधिसूचना/ ४९७६-५११२/१५, दिनांक २०/०७/२०१५

उपरोक्त विषयासंबंधी या कार्यालयाचे संदर्भिय परिपत्रकाव्दारे सर्व निबंधकांना शासनच्या दिनांक १५/०५/२०१५ च्या अधिसुचनेनुसार ज्या मुलाच्या जन्माची नोंदणी नावाशिवाय झालेली आहे, त्यांचे नाव समाविष्ट करण्यासाठी दिनांक १४/०५/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे असे कळविण्यात आले आहे.

परंतू या कार्यालयाच्या असे निर्दशनास आले आहे की, काही वर्तमानपत्रात **"जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करण्या"** ऐवजी **"जन्म नोंदणीची अखेरची संधी मे २०२० नंतर जुन्या जन्म नोंदीवर बंदी"** अशा आशयाच्या मातम्या देण्यात आलेल्या आहेत. अशा बातम्या नागरीकांची दिशाभुल करणा-या आहेत.

याबाबत राज्यातील सर्व निबंधक, जन्म-मृत्यू यांना कळविण्यात येते की, प्रसिध्दी देताना दिनांक १५/०५/२०१५ च्या शासन अधिसूचनेनुसार माहिती द्यावी व जन्म नोंदणीत बाळाचे नाव समाविष्ट करणेबाबत असे नमूद करावे.

( डॉ. एन.डी.देशमुख )
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत सविनय सादर :

१) मा.संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.
२) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) मा.संचालक, आरोग्य सेवा, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.

प्रत सस्नेह - उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळे... (सर्व)

प्रत माहितीसाठी - अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (कु.क.), गो.ते.रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई-३२

*F:83/Circular.2019*